ISSN - 2229-4929
RNI : MAHMAR - 36829-2010

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal

UGC CARE LISTED JOURNAL

January - 2020

## Progressive Thinkers in Maharashtra

Executive Editor
Dr. Subhash Nikam
Principal
Mahatma Gandhi Vidyamandir's
Karmaveer Bhausaheb Hiray Arts, Science & Commerce College, Nimgaon,
Tal. Malegaon, Dist. Nashik [M.S.] INDIA

Co-Editor
Asso Prof.Subhash L. Ahire

Chief Editor
Dr. Nanasaheb Suryawanshi

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV' RUKMENAGAR, THODGA ROAD, AHMEDPUR,
DIST. LATUR,-433515, MAHARASHTRA

Published by - Dr. Subhash Nikam, Principal, KBH College Nimgaon, Tal. Malegaon, Dist. Nahik, MS

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The authosr shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors

Price: Rs. 800/-



Scanned with CamScanner

RNI: MAHMAR-36829-2010 | ISSN : 2229-4
January - 202

<u>INDEX</u>


| No. | Title of the Paper<br>Authors | Page No. |
|---|---|---|
| 1 | कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊसाहेब हिरे.<br>प्रा. सुभाष लक्ष्मण अहिरे | 6 - 9 |
| 2 | कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचे शैक्षणिक कार्यामधील योगदान<br>प्रा. ए. एच. शिंदे | 10 - 11 |
| 3 | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे महिला सक्षमीकरणातील योगदान<br>प्रा. ए. जी. नेरकर | 12 - 15 |
| 4 | ''कर्मवीर विठ्ठलरामजी शिंदे यांचे विचार व कार्य : एक अभ्यास''<br>डॉ. अशोक कडुभाऊ कानडे | 16- 18 |
| 5 | राजर्षी शाहू महाराजांच्या-सामाजीक, शैक्षणिक व आर्थिक सुधारणांचा अभ्यास<br>प्रा. भरत आहेर | 19- 21 |
| 6 | ''डॉ.भाऊ दाजी लाड यांची पुरोगामी विचारसरणी व कार्य''<br>डॉ. डि.जे. सोनवणे | 22 - 23 |
| 7 | <u>महाराष्ट्रातील</u> पुरोगामी चळवळीत कॉ. डॉ. नरेंद्र दाभोलकररांचे योगदान<br>प्रा.डॉ.गो.पा.फसले | 24 - 27 |
| 8 | पुरोगामी महाराष्ट्र निर्मितीत पंडिता रमाबाई यांचे योगदान व कार्य<br>डॉ. गणपत विष्णू गट्टी | 28 -29 |
| 9 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुरोगामी विचारवंत म्हणून आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान<br>प्रा. डॉ. सुनिल वाळू घुगे | 30 - 31 |
| 10 | महाराष्टातील पुरोगामी चळवळ दलित चळवळ एक अभ्यास<br>प्राए.हनुमंत भारत सरतापे | 32 - 34 |
| 11 | राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षण विषयक विचार आणि कार्य<br>प्रा. जितेंद्र डी. पगार | 35 - 37 |
| 12 | महाराष्ट्रातील पुरोगामी राजकीय विचारवंत - यशवंतराव चव्हाण<br>Santosh DattaramJadhav | 38 - 40 |
| 13 | " राष्ट्रपिता महात्मा गांधीजीचे " ग्राम स्वराज्या " बाबतचे धोरण ".<br>प्रा. डॉ. कांबळे एम.एस. | 41 - 43 |
| 14 | " भारतीय समाज आणि वैदिक संस्कृतीतून झालेले समाज स्तरीकरण एक विश्लेषनात्मक मांडणी "<br>प्रा. डॉ. गायके संदिपान कोंडिबा | 44 - 46 |
| 15 | ''लोकहितवादींचे विचार व कार्य : एक अभ्यास''<br>प्रा.काशिद रामभाऊ देवराव | 47 - 48 |
| 16 | पूर्व खानदेशातील राजकीय-सामजिक चळवळी<br>प्रा.डॉ.मनिष सोनवणे | 49 -50 |
| 17 | महात्मा फुले यांची पुरोगामी विचारसरणी : एक अभ्यास<br>प्रा. मनोज बबनराव देवकर | 51 - 52 |
| 18 | महाराष्ट्रातील पुरोगामी विचारवंत महात्मा जोतीराव फुलेंचे सामाजिक व शैक्षणिक प्रबोधन<br>प्रा.डॉ. नितीनकुमार दादासाहेब माळी. सौ. निलीमा विक्रम महाजन (माळी) | 53 - 54 |




Scanned with CamScanner

# पूर्व खानदेशातील राजकीय-सामजिक चळवळी

प्रा.डॉ.मनिष सोनवणे
म.स.गा.महाविद्यालय,मालेगाव कॅम्प

वर्तमानकालीन राजकारणाचे संदर्भ हे गतकाळातील राजकारणातून मिळत असतात. वर्तमान घडणाऱ्या राजकीय घटना यांचा अर्थ समजण्यासाठी भूतकाळातील राजकीय प्रसंग, घटना या मदतनीस ट जिल्ह्याच्या आज अस्तित्वात असलेल्या राजकारणाची प्रत्यक्षात कशारितीने जडणघडण होत गेली, हे अभ्यासणे महत्वाचे आहे. जिल्ह्याच्या राजकीय जडणघडणीची सुरुवात ही स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झाली. यात दे स्वातंत्र्यलढ्याची भूमिका महत्त्वाची होती. जिल्ह्याच्या राजकीय विकासात भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे महत्वपूर्ण य आहे. या अनुषंगाने स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जिल्ह्याच्या राजकारणाचे स्वरूप कसे होते याचे अध्ययन करता ब्रिटीशांविरोधात उभ्या राहिलेल्या जनसंघर्षात विविध राजकीय पक्ष, संघटना, संस्था यांनी जिल्ह्यात लोकसंघटन स्वातंत्र्यलढ्यासाठी महत्वाची भूमिका बजावली होती, त्यांनी फक्त परकीय सत्तेविरुध्दच लढण्याचे कार्य केले ना जिल्ह्यातील जनतेमध्ये राजकीय प्रबोधनाचे देखील कार्य केले.

## ब्राह्मणेतर चळवळीचे योगदान

महाराष्ट्रातील राजकारणास व सामाजिक जीवनास एकेकाळी सर्वाधीक प्रभावीत करणारी चळवळ ब्राह्मणेतर चळवळीकडे पाहिले जाते. १८९९पासून खानदेशात ही चळवळ सुरु झाली, १९१२ मध्ये खानदेश मराठा समाजाचे अधिवेशन धुळे येथे भरले होते. यात अनेक ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी भाग घेतला. त्यामुळे ही परिषद जा-दे सत्यशोधक चळवळीची मुहूर्तमेढ समजली जाते.[१] त्याकाळी विषमता व अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यात ब्राह्मणेतर कार्यकर्ते खूपच पुढाकार घेत असत व या कामात काँग्रेस किंवा स्वराज्य पक्षाच्या कार्यकर्त्यांना देखील सामील घेत. अर्थात प्रस्थापित राजकीय सभेच्या नेते मंडळींना या कामात फारसा रस नव्हता. तसेच सत्यशोधक चळव कार्यकर्ते देखील काँग्रेसपेक्षा वेगळा गट स्थापन करून राजकीय हालचालीत सहभाग घेत खानदेशात त्यावेळेस ब्राह्म चळवळीतील कार्यकर्त्यांना 'राव पार्टीचे लोक' म्हणत असेही म्हटले जात होत.

### अ) पूर्व खानदेशपेक्षा पश्चिम खानदेशात चळवळीचा अधिक जोर -

पूर्व खानदेशपेक्षा पश्चिम खानदेशात ब्राह्मणेतर चळवळीला अधिक जनसमर्थन प्राप्त करण्यात यश मिळाले १९२१-२२ या दरम्यान कोल्हापूरहून प्रसारीत ब्राह्मणेतर पक्षाचे काही सत्यशोधक जलसे जिल्ह्यात आले. हे पाहण्यासाठी लोक जमत, तथापी ब्राह्मणेतर विचारांना येथे फारसा थारा मिळालेला चाळीसगांव,पाचोरा,पारोळा,भडगांव,रावेर इ.परिसरात या चळवळीस काहीसे समर्थन मिळाले. १९२० मध्ये ब्रा पक्षाने नाशिक व धुळे येथील लोकल बोर्डची सत्ता प्राप्त केली होती. पश्चिम खानेदशात १९२८ मधील जिल्हा बोर्डाच्या निवडणूकीत ब्राह्मणेतर पक्षास यश मिळाले. पक्षाचे नते नामदेव अहिरराव हे त्यावेळी जिल्हा बोर्डाचे देजील झाले होते. ज्या ठिकाणी ब्राह्मणेतर चळवळ जोरात होती तेथे त्यांनी ब्राह्मणांकडून सत्ता हस्तगत करत शिरकाव करण्याचा जोरदार प्रयत्न केला होता.[३] याचा अर्थ शेजारील नाशिक व धुळे जिल्ह्याच्या तुलनेत ज जिल्ह्यात ब्राह्मणेतर चळवळीचा जोर कमी होता. १९३७ च्या विधीमंडळ निवडणुकीत देखील पश्चिम खानदेशा पार्टीच्या सत्यशोधक समाजात काम करणाऱ्या मंडळींमुळे तेथे काँग्रेसचा प्रभाव कमी पडला होता.

### ब) पूर्व खान चळवळीचे नेतृत्व मराठेतर जातींकडे -

महाराष्ट्रात ब्राह्मणेतर पक्षाचे नेतृत्व मराठा जातीकडे होते. मात्र पूर्व खानेदशात या पक्षाचे नेतृत्व म जातींकडे होते. सिताराम नाना चौधरी, चौधरी वकील, डोंगरसिंग पाटील यासारखे मराठेतर नेते जिल्ह्यात सुरुव काळात ब्राह्मणेतर पक्षाचे नते म्हणून ओळखले जात होते. सिताराम चौधरी यांनी आत्मोध्दार (१९२३) हे सा ब्राह्मणेतर विचारांच्या प्रसारासाठी सुरू केले होते. १९२३ मधील कौन्सील निवडणूकीत डोंगरसिंग पाटील व वकील हे दोघे विजयी झाले होते. मात्र १९२६ मध्ये ब्राह्मणेतर पक्षामधील फुटीमुळे पक्षाचे उमेदवार सिताराम पराभूत झाले.[४]

ब्राह्मणेतर पक्षामधील मराठा - मराठेतंर यांच्यातील मतभेद, जातवार मतदार संघाच्या मागणीवरून तीव्र ब्राह्मणेतर चळवळीला बहुजन समाजाच्या चळवळीचे स्वरूप देण्यासाठी राज्य पातळीवरून खानदेशात अनेक प्रयत्न त्यासाठी मराठेकरणाची प्रक्रिया देखील राबवली गेली. सन १९३१ मध्ये क्षात्र जगदगुरूंनी असे फर्मान काढले हो खानदेशातील सर्वजण कुणबी किंवा कुरवाडी म्हणतात ते मराठेच आहेत. अज्ञानासाठी ते स्वतःला मराठेतर म्ह



Scanned with CamScanner

शिक्षित मराठ्यांनी हे त्यांना समजून सांगावे.[५] १९२० मध्ये पी. सी. पाटील यांनी खानदेशातील तिरोळे कुणबी समाजाच्या मराठेकरणाची मोहिम हाती घेतली होती. मात्र प्रखर जातीनिष्ठा व तीव्र क्षत्रिय गंड यामुळे या प्रक्रियेला फारसा प्रतिसाद मिळाला नाही.[६] दलित सुधारणा चळवळ:-दलितांच्या हितसंबंधामध्ये सुसूत्रता यावी तसेच दलितांना संघटीत करून त्यांच्या राजकीय हक्कासाठी त्यांना राजकीय पक्षाच्या माध्यमातून एक सनदशीर मार्ग उपलब्ध करून द्यावा, यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र मजुर पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन आणि अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष असे जे राजकीय पक्ष वेळोवेळी स्थापन केले, त्यांचा खानदेशातील सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय चळवळीवर प्रभाव पडलेला दिसतो.

बहिष्कृत अवस्थेतून मुक्त होण्यासाठी दलित समाज सुधारकांनी जिल्ह्यात अनेक बहिष्कृत परिषद आयोजित केल्या होत्या. त्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार, भूमिका त्याचा प्रसार करणे तसेच सुधारणांच्या कार्यक्रमाच्या प्रचारासोबतच चळवळीला संघटनात्मक बांधणी करणे हे या परिषदांच्या आयोजनामागचे मुख्य हेतू होते. अशीच शैक्षणिक उन्नतीसाठी विविध जातींची बहिष्कृत परीषद चाळीसगांव तालुक्यातील वहाळ येथे दि.२९ सप्टेंबर १९२५ रोजी आयोजीत करण्यात आली होती. जिल्ह्यातील गेढे गुरुजींनी खानदेशातील दलितांच्या उत्थापनाच्या काळात हिरीरीने पुढाकार घेतला होता, १९२५ मध्ये त्यांनी चोखामेळा वसतीगृह सुरू केले तर १९२९ साली तरूज बहिष्कृत व १९३९ साली सेवक हे वृत्तपत्र सुरू केले होते. त्याचप्रमाणे धनाजी बिऱ्हाडे यांनी दलित भारत हे मासिक सुरू केले होते. खानदेशाच्या इतिहासात प्रथमच येथे रिपब्लीकन पक्षाचे दोन दिवसीय राष्ट्रीय अधिवेशन भरले होते. १९३७ मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रचारासाठी नेरी, जामनेर, एदलाबाद, भुसावळ इत्यादी ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः प्रचार दौरा काढला या निवडणूकीत पश्चिम विभागातील राखीव जागेवर मजूर पक्षाचे उच्चशिक्षित तरूण उमेदवार डी. जी. जाधव विजयी झाले होते. १४ एप्रिल १९२९ रोजी बाबासाहेबांनी असोदे येथे सभा घेतली. या सभेने हे खानदेशात सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. असोदे गावी डॉ. आंबेडकर सात दिवस वास्तव्यास होते. धर्मांतराशिवाय दुसरा मार्ग नाही असा विचार सर्वप्रथम त्यांनी याच सभेत मांडला. बारा दलितांनी धर्मांतर करून मुस्लिम धर्माची दिक्षा करून घेतली. त्यावेळी आंबेडकरांनी ह्या घटनेचे स्वागत करताना बहिष्कृत भारतच्या २१ जून १९२९ च्या अंकात नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही हे असे ? असा अग्रलेख लिहून संबंधित दलितांची पाठराखण केली. दुसरीकडे काँग्रेसचे विविध आश्रमांमधून साने गुरूजी, धनाजी नाना चौधरी यांच्या प्रयत्नातून मंदिर प्रवेश, अस्पृश्यता निवारण, सहभोजन यासारखे उपक्रम राबविण्यात येत होते.

अशारितीने, जिल्ह्यात राष्ट्रवादी विचारांना बळकटी मिळवून देण्याचे व चालना देण्याचे कार्य विविध राजकीय पक्ष व चळवळींच्या माध्यमातून स्वातंत्र्यपूर्व काळात होत होते, अर्थात त्यात काँग्रेसची भूमिका महत्वाची व मध्यवर्ती होती. फैजपूर अधिवेशनामुळे काँग्रेस जिल्ह्यातील कानाकोपऱ्यात पोहचली एवढेच नव्हे तर या अधिवेशनाचा प्रभाव जिल्ह्यातील इतर पक्ष व संघटनांच्या वाटचालीवर देखील झाल्याचे जाणवते. यासोबत ब्रिटीश काळात घेण्यात आलेल्या मध्यवर्ती व प्रांतिय कौन्सिलच्या निवडणूकींनी देखील जिल्ह्याच्या राजकीय जडणघडणीत व सामाजिक जीवनास चालना देण्यात महत्वाची भूमिका बजावली. या सर्व राजकीय पक्ष व त्यांचे नेते, संघटना, परिषदा यात सहभागी कार्यकर्ते, विविध परिषदांमधून मंजूर करण्यात आलेले ठराव, स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या निवडणूका या सर्व घडामोंडीतून स्वातंत्र्यपूर्व काळात जळगाव जिल्ह्यातील राजकारण घडले

१. रंधे विजय - *१९२० - ४७ या कालखंडातील खानदेशचे राजकारण*
पीएच.डी. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे, पृ.क्र.२५६.

२. उपरोक्त पृ.क्र. २५६

३. डॉ. चौधरी कि. कि. - *महाराष्ट्र शासन गॅझेटियर जळगाव जिल्हा,* १९९४ पृ. २९०.

४. Dahiwale S. M. - *Consolidation Of Maharashtra Dominance in Maharashtra* - EPW 11-2-1995 Page No.336

५. भोळे भा.ल. - *मराठा - मराठेतर वाद, मराठा,* २०११, पृ.क्र. ९२.

६. उपरोक्त - पृ.क्र. ९९.



Scanned with CamScanner